नि.दि. दावा क्र.६५/२००९
अब्दुल समद निजामोद्दीन वि अब्दुल वाहेद शेख अमीर
निशाणी क्र. ७४ लगत

<u>**प्रतीवादीतर्फे साक्षीदार क्रं. १ चा पुढील उलटतपास विधिज्ञ श्री.पी.के.निकम**</u>

२६. हे खरे नाही की, घर मिळकतीच्या वाटणी पत्रकानुसार ज्या मिळकती मला आल्या त्याबाबत नामांकन होण्यासाठी कार्यवाही केली. (साक्षीदाराला उलटतपासादरम्यान दस्त दाखविण्यात आला) हे खरे नाही की, सदर संचिकेप्रमाणे मी नगरपरिषदेमध्ये अर्ज दिला होता व त्यासोबत मी वाटणी पत्रक केलेले होते. (सदर संचिकेमधील सार्वजनिक स्वरुपाचे जे दस्त आहेत त्याला निशाण देण्यात येते त्यापैकी अनुसूची ३, प्रसिध्दी पत्रक वगैरे अशा स्वरुपाचे सार्वजनिक जे दस्त आहेत त्यांना **निशाणी क्र.१७१ ते १८२** देण्यात येते.)

२७. हे खरे नाही की, आता मला दाखविण्यात आलेल्या वाटणी पत्रकावरती सही माझी आहे व ते मी केलेले आहे. (वाटणी पत्रक उलटतपासादरम्या दाखविल्यामुळे त्याला ओळखण्यासाठी **निशाण क्र.१८३** देण्यात येते). हे खरे नाही की, आता मला दाखविण्यात आलेला अर्ज मी तलाठी यांच्याकडे दिला होता व त्याच्यावर माझी सही असून माझ्या भावासोबत झालेल्या वाटणीच्या अनुषंगाने कन्नडची जमीन माझ्या नावावर व निम्मी जमीन अब्दूल समदचे वडील नजमोद्दीनच्या नावावर आहे, आता सदर १०८ ची पूर्ण जमीन व सर्वे नं.८१ मधील निम्मी जमीन अब्दूल समद नजमोद्दीनच्या नावावर करण्यास माझी कोणतीच हरकत नाही व मी स्वखुशीने संमती देत आहे, तरी अब्दूल समद नजमद्दीनच्या नावावर वाटणी

पत्राप्रमाणे व वारसा प्रमाणे फेर करण्यावा अशा आशयचा अर्ज मी दिला होता. (सदरचा दस्त तहसील कार्यालयाच्या अभिलेखातून सार्वजनिक स्वरुपाचा दस्त म्हणून सादर करण्यात आलेला आहे. मात्र साक्षीदार त्याबातची योग्यता नाकारतात. त्यामुळे त्याबाबत एकंदरीत पुराव्यावरुन त्याच्या योग्य तो निष्कर्ष भविष्यात काढला जावू शकतो तुर्तास त्याला ओळखण्यासाठी **निशाण क्र.१८४** देण्यात येते).

२८. हे खरे नाही की, तलाठी यांच्याकडे नाहरकत दिली व त्यानंतर अब्दूल समद यांच्या नावे दावा जमिनीची नोंद झाली.

प्रश्न - अब्दूल समद यांच्या नावे कशाच्या आधारे जमिनीची नोंद झाली ?

उत्तर - जमीन आमच्याच नावावर आहे.

प्रश्न - मग तुम्ही महसूल न्यायालयात उपजिल्हाधिकारी यांच्याकडे अपील कशाच्या आधारे केले होते ?

उत्तर – फेर क्रमांक १२६८४ च्या आधारे आम्ही अपील केले होते.

२९. हे खरे आहे की, आठेगाव येथील गट नं.८१ यामधील जी जमीन आहे ती, मसीयोद्दीन गुलाम मेहमूद यांना विकली होती. हे खरे आहे की, फेर क्र.९१३ याची नोंद झालेली आहे. हे खरे नाही की, सदर फेरफार त्याबाबतच्या व्यवहाराचा नाही. (सदर फेरफार सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाण क्र.१८५** देण्यात येते.) सदर फेरफार या या खान यांनी मसीयोद्दीन गुलाम मेहमूद यांच्याकडून घेतलेल्या खरेदी बाबतचा आहे. आता मला दाखविण्यात आलेल्या खरेदी पत्रामध्ये मसीयोद्दीन आणि या या खान यांच्या दरम्यान झालेल्या खरेदी पत्रामध्ये मी साक्षीदार म्हणून सही केलेली नाही. (सदर खरेदी पत्र सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाण क्र.१८६** देण्यात येते.)

३०. कन्नड येथे अब्दूल वाहेद शेख अमिर नावाचा एकच व्यक्ती आहे. साक्षीदार सांगतो अजून असतील तर माहिती नाही. आठेगाव येथील गट क्र.८१ माझ्या मालकीची होती. हे खरे नाही की, गट क्र.८१ मधील जमीन मी मसीयोद्दीन गुलाम मेहमूद यांना विक्री केली होती. गट क्र.८१ बाबत जे अब्दूल वाहेद शेख अमिर आहे तो मीच आहे. हे खरे नाही की, आता मला दाखविण्यात आलेल्या खरेदी पत्रकानुसार मी मसीयोद्दीन गुलाम मेहमूद यांना गट क्र.८१ मधील क्षेत्र १ हे ६० आर विक्री केले होते व त्या खरेदी पत्रावर माझी लिहून देणार अशी सही आहे. (सदर खरेदी पत्र सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाण क्र.१८७** देण्यात येते.) हे खरे नाही की, सदर खरेदी पत्रावर माझा भाउ अब्दूल समद नमोद्दीन यांनी साक्षीदार म्हणून सही केली होती. मला हे सांगता येणार नाही की, सदर खरेदी पत्रा आधारे मसीयोद्दीन यांच्या नावे फेरफार क्र.९११ ची नोंद झाली होती किंवा कसे. (सदर फेरफार सार्वजनिक दस्त असल्यामुळे त्याला **निशाण क्र.१८८** देण्यात येते.)

३१. गट नं.८१ मधील १ हे ६० आर जमीन माझ्या नावे आजरोजी नाही.

प्रश्न - तशी जमीन तुमच्या नावे का नाही ?

उत्तर - त्यांनी त्यांची जमीन विकली आणि आम्ही आमची जमीन विकली.

मी माझी जागा कोणाला विकली हे माझ्या लक्षात नाही. हे खरे नाही की, या कामी आता मला दर्शविण्यात आलेल्या कागदपत्रांवर माझ्या सही आहेत व मी जाणूनबुजून त्या सहया नाकारत आहे. साक्षीदार पुन्हा सांगतो की, त्या सहया माझ्या आहेत किंवा कसे तसेच काही कागदांवर सहया असतील तर त्या गोष्टी जुन्या झालेल्या आहेत. (साक्षीदाराला उलटतपासादरम्यान संचिकेतील अनुक्रमांक २ व ३ वरील कैफियत

आणि पुरशीसची सही शिक्याची नक्कल दाखविण्यात आली) या कागदांवर माझ्या सहया आहेत किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. (सदर दस्त सार्वजनिक स्वरुपाचे असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.१८९ आणि १९०** देण्यात येते)

३२. हे खरे आहे की, सय्यद हिलाल यांनी जो दावा दाखल केला होता त्यामध्ये मी आणि माझा भाउ हे प्रतिवादी होते. त्या दाव्यामध्ये कैफियत देणेकामी आमच्या वकिलांना माहिती दिली होती. हे खरे आहे की, त्या दाव्यात आमचे वकिल नाझीमअली होते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्यांना बदलून आम्ही विधिज्ञ आतामुस्तफा व झीया मुस्तफा दिले होते. हे खरे आहे की, सय्यद हिलाल यांनी दाखल केलेला दावा या दाव्यातील सर्वे नं.१०८ बाबत होता. आता मला दाखविण्यात आलेल्या दाव्याची निशाण क्र.१ ची प्रत तीच आहे. (सदर दस्त सार्वजनिक स्वरुपाचे असल्यामुळे त्याला **निशाणी क्र.१९१** देण्यात येते)

३३. हे खरे आहे की, जी माहिती मी माझ्या वकिलांना दिली होती त्याप्रमाणे माझ्या वकिलांनी माझी कैफियत त्या दाव्यामध्ये दाखल केली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी चुलत भावाच्या दबावामुळे कैफियत दिली होती त्यामुळे मी नंतर कैफियत बदलली होती. त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा आमच्याकडे आहे. मी अब्दूल समद आणि विधिज्ञ नाझीम अली यांच्या विरुध्द त्या दाव्यात कारवाई केली होती. मी त्यांच्या बाबत काही फौजदारी प्रकरण दाखल केले नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मला सांगता येणार नाही. तो जबाब रदद झाला होता किंवा कसे ते मला सांगता येणार नाही. त्याबाबतचा पुरावा मी दाखल केलेला आहे.

३४. मराठीत असणारा कागद मी वाचून त्यावर सही करीत असतो. साक्षीदाराला **निशाण क्र.१९०** वरील पुरशीस दाखविण्यात आली. मला हे सांगता येणार नाही की, **निशाण १९०** वरील पुरशीस प्रमाणे नि.दि.अ. क्र.१७१/२०००

निकाली करण्यात आले होते किंवा कसे आणि त्यावर मी सही केली होती किंवा कसे. माझ्या म्हणण्याप्रमाणे नि.दि.अ. क्र.१७१/२००० बिनशर्त काढून घेण्यात आला असे दाखविण्यासाठी असणारा कागद म्हणजे त्या अपीलाच्या आदेशात तसे लिहलेले आहे. मी तश्या प्रकारचा आदेश या प्रकरणात दाखल केलेला आहे.

३५. या दाव्यातील तुर्तातूर्त आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय यांच्यासमोर दाखल असलेल्या याचिकेमध्ये काय आदेश झाला याची मला माहिती नाही. वादी यांना काय मनाई आदेश मिळाला होता याची माहिती वकिलांनी सांगितली होती.

प्रश्न – मा.उच्च न्यायालयाने काय आदेश दिला होता याची माहिती वकिलांनी दिली होती ?

उत्तर – माहिती दिली होती, आता मला सांगता येणार नाही, आज सांगता येणार काय झाल होत.

(साक्षीदाराला यापूर्वी सूचना देण्यात आल्या होत्या की, एका प्रश्नात त्यांनी स्पष्टपणे एक उत्तर देणे अपेक्षित आहे मात्र, वारंवार सूचना करुन देखील साक्षीदार स्पष्ट प्रश्नाबाबत वेळोवेळी वेगळी उत्तरे देतात. त्यांना सांगून देखील त्यांच्याकडून असे कृत्य वारंवार होत असल्यामुळे त्यांची वर्तवणूक या ठिकाणी नोंदविण्यात येते.)

**दुपारची सुट्टी झाल्यामुळे उलटतपास दुपारच्या सत्रापर्यंत तहकूब**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन

स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2024.10.25 13:43:41 +0530

कन्नड. (वि. द. पाटील)

दिनांक : २४/१०/२०२४ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कन्नड.

01:57:33 PM